सायं.दैनिक
विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ●
Mo-9422404740

श्री .पुरुषोत्तम उढाण यांची भारतीय जनता पार्टी घनसावंगी तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्याच्या सत्कार करताना शिवसेना घनसावगी तालूका अध्यक्ष (अ.वी.) सलमान पठान , राजू पठान , फ़ज़ल पठान आमोल कारके व मित्र परिवार

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | व्दिभाषिक | वर्ष ०२ अंक - १०६ गुरूवार, दि.२४ एप्रिल २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 106 Thursday, Dt.24 April 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

आरोग्य विभागातील मोठ्या लाट साहेबाकडं कोट्यावधीची संपत्ती !

शेतकऱ्यांच्या नावे घेतली कोट्यावधीची जमीन अन केली पावर ऑफ थॉरिटी चौकशी केल्यास ज्याला देवदूत म्हणतात त्याचे कारणामे येणार बाहेर

विश्वनायक न्यूज

आरोग्य विभागामध्ये उच्च पदावर काम केलेल्या एका कथित लाट साहेबाकडं कोट्यावधींची संपत्ती असल्याचे समोर येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांना त्याच्या नोकरीच्या हिशेबाने उभ्या आयुष्यात जेवढी संपत्ती कमवता येणार नाही तेवढी त्याने कमवली आहे. एवढी मोठी संपत्ती कमविण्याचा त्याचा मार्ग कोणता ? असा प्रश्न उपस्थित झाला असून, या अधिकाऱ्याने त्या परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांच्या नावाने कोट्यावधीची जमीन खरेदी केली आणि त्याची पावर ऑफ अथॉरिटी करून घेतली आहे. या अधिकाऱ्याचे कारणामे बाहेर आले तर, ज्याला आपण देवदूत म्हणतो त्याला तोंड लपवायला जागा राहणार नाही. यासाठी या प्रकरणाची चौकशी होण्याची गरज असून, समाजसेवेच्या नावाखाली बुरखा पांघरणाऱ्या अधिकाऱ्याचा खरा चेहरा समोर आला पाहिजे. कारण त्याने सामान्य जनतेचीच लूट केली आहे.

राज्यातील जनतेचे आरोग्य सुधारावे, त्यांना उपचारासाठी कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नये आणि उपचारा अभावी कोणाचा जीव जाऊ नये यासाठी महाराष्ट्र सरकार सातत्याने प्रयत्न करते. म्हणूनच आरोग्य सेवा देण्यासाठी अनेक योजना राबविल्या जातात. जिल्हा ते तालुका आणि ग्रामीण स्तर अशा पद्धतीने राज्यामध्ये आरोग्याचा विस्तार करण्यात आलेला आहे. यासाठी राज्यच नाही तर केंद्र सरकार सुद्धा लाखो नाहीतर कोट्यावधी रुपये खर्च करते. विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. सरकारच्या या योजना जशाच्या तशा सामान्य पर्यंत गेल्या तर त्यांचे आरोग्य पूर्णपणे सुधारू शकते. मात्र यामध्ये प्रशासकीय अधिकारी खोडा घालताना दिसतात. आरोग्य विभागात असलेले लालची अधिकारी शासनाकडून आलेल्या पैशाचा अपहार करतात. याबाबतची अनेक प्रकरणे राज्यामध्ये उघडकीस आली आहेत. विशेष करून कोरोनाच्या काळामध्ये केंद्र आणि राज्य सरकारने सामान्य

नागरिकांच्या आरक्षणासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. मात्र ज्यांच्या हातामध्ये हा कारभार दिला त्या अधिकाऱ्यांनी यात प्रचंड मोठा घपला केला. बीड जिल्ह्यामध्ये सुद्धा त्या काळात प्रचंड मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. हा अत्यंत दुर्दैवी प्रकार असून, शासनाच्या योजनेला हा मोठा धक्का आहे. बीड जिल्हात नाहीतर इतर ठिकाणी सुद्धा असे भ्रष्टाचाराचे प्रकरण घडले. मात्र बीड जिल्ह्यामध्ये ज्यांनी भ्रष्टाचार केला असे अधिकारी स्वतःला समाजसेवक म्हणवून मिरवतात, दुसरीकडे मात्र त्यांनी शासनाचा कोट्यावधींचा निधी लुटला आहे. स्वतःच्या नोकरीनुसार हैसियत नसताना सुद्धा अधिकची संपत्ती त्यांनी कमावली आहे. याबाबतची माहिती समोर येत असून, प्रशासनाने आणि शासनाने याची सखोल चौकशी केली तर संबंधित वरिष्ठ अधिकारी यात दोषी आढळून येईल.

अंबाजोगाई, केज, रेणापूर संपत्तीची केंद्रं

आरोग्य विभागातील या अधिकाऱ्याने बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा ते अंबाजोगाई रोडवर, केज या तालुक्यासह अंबाजोगाई ते रेणापूर रोडवर मोठ्या स्थरावर मालमत्ता घेतले आहे. ज्या माणसाचे उत्पन्न मर्यादित आहे, तो एवढी खरेदी करूच शकत नाही. मात्र संबंधित अधिकाऱ्याने कोट्यावधीची जमीन या ठिकाणी खरेदी केली आहे. केवळ जमीनच नाही तर वेगवेगळ्या पद्धतीने या तीन तालुक्यांमध्ये त्याने संपत्तीचे एकत्रीकरण केले आहे. यासाठी स्थानिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांना यात समाविष्ट करून घेतले आहे.

सामाजिकतेचा बुरखा पांघरणारा लुटारू ?

लोक ज्या आरोग्य सेवेला ईश्वराची सेवा म्हणतात, त्याचा गैरफायदा घेण्याचे पाप या क्षेत्रात काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी केले आहे. कोरोना काळ असो किंवा त्या अगोदरचा आणि नंतरचा काळ असो त्या प्रत्येक काळामध्ये त्यांनी शासनाची आणि पर्यायाने जनतेची फसवणूक केली आहे. शासनाचा पैसा लुटणे म्हणजे जनतेच्या सुविधा काढून घेणे असा अर्थ होतो. मात्र तरीसुद्धा आपण किती चांगले आहोत हे दाखविण्यासाठी या अधिकाऱ्यांनी जनतेवर उपकार केल्याची भाषा केली. म्हणजे समाजसेवेचा बुरखा पांघरून संबंधित अधिकाऱ्याने अक्षरशः लुटारूचे काम केले. याचसाठी या अधिकाऱ्याचा बुरखा फाडण्याची गरज आहे.

श्री जे.एल पठाण गुरुजी यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ संपूर्ण गावाला दिले स्नेहभोजन

पाटोदा / फयाज सय्यद

दिनांक २०/०४/२०२५ रोजी आपली जन्मभूमी असलेली शिरूर कासार तालुक्यातील मौजे लिंबा गावास आपले वडील स्वर्गीय लालखा साहेबखा पठाण यांच्या स्मरणार्थ स्नेहभोजनाचे आयोजन फुंदाबी पठाण शिक्षण प्रसारक मंडळ नाळवंडीचे श्री पठाण जे एल साहेब यांच्यातर्फे स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम लिंबा ग्रामपंचायत च्या वतीने आदरणीय लिंबा गावचे भूमिपुत्र श्री पठाण गुरुजी यांचा सपत्नीक सत्कार लिंबा गावचे सरपंच श्री बालाजी गीते यांच्यातर्फे करण्यात आला करण्यात आला. संस्थेच्या वतीने गावचे सरपंच श्री. बालाजी गीते गावचे उपसरपंच रेवन नाथ धांडे गावचे पोलीस पाटील खंडू पवार श्री केशव नागरगोजे, काशिनाथ गीते, ज्ञानदेव नागरगोजे, बाबाजी खेडकर, तुळशीराम नागरगोजे, भास्कर धांडे, मोहन धांडे ,गहिनीनाथ नागरगोजे, श्रीराम नागरगोजे, वैजनाथ गीते, बाळासाहेब नागरगोजे, लक्ष्मण नागरगोजे, गहीनाथ धांडे, आदर्श

शिक्षक कचरू लांडगेसर, नामदेव धांडे, गोरक्षनाथ बांगर, जालिंदर नागरगोजे, दिनकर नागरगोजे, बबन काशीद ,इब्राहिम रसूल खान पठाण व इतर नागरिकांचा सत्कार आदरणीय पठाण सरांचे पुत्र तथा नाळवंडी गावचे सरपंच श्री डॉ. इकबाल पठाण साहेब व दुसरे पुत्र श्री डॉ सादेक पठाण साहेब व जानपिर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख के. एस (पठाण मॅडम) यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन करण्यात आला.

आदरणीय सचिव साहेब यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की माझ्या जन्मभूमीशी माझे काही देणे लागते या उदात्त हेतूने मी प्रेरित होऊन व माझ्या वडिलांच्या स्मरणार्थ गाव भोजन घालावे याबद्दल माझ्या स्वर्गीय आईची इच्छा होती ती आज पूर्ण होत आहे याबद्दल मी समाधानी आहे माझ्या परीने या गावासाठी मी नेहमी सहकार्य करेल याबद्दल मी आपणास ग्वाही देतो असे उद्गार काढले यानंतर या गावचे सरपंच वैजनाथ गीते यांनी सांगितले जो व्यक्ती ८२ वर्षाचा असून पण तरुणाला लाजवेल असा जीवन प्रवास त्यांचा आहे ज्याप्रमाणे घर हिंडते आकाशी चित्त तिचे पिल्लापाशी याप्रमाणे त्यांचे आपल्या जन्मभूमीवर अतूट प्रेम आहे असे उद्गार काढले .

पौंडूळ गावचे आदर्श शिक्षक श्री. कचरू दगडू लांडगे सर यांच्या वतीने सरांचा सपत्नीक पोशाख देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर संपूर्ण लिंबा ग्रामस्थांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री सुनील साबळे सर यांनी केले तर उपस्थित ग्रामस्थांचे आभार श्री. श्रीराम जाधव सर यांनी मानले या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व लिंबा गावचे ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले यामुळे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

डझन भर नगरसेवक पाणी स्वच्छता लाईट साठी सि.ओ.च्या कॅबिन मध्ये घुसले

११ महिने झोपणारी न.प.ने भर उन्हाळ्यात पाइपलाइन दुरूस्ती सुरू केली

बीड (प्रतिनिधी) सध्या उन्हाळा सुरू आहे तापमान ४० ते ४२ अंशावर गेलेले दिसून येत आहे उन्हामुळे पिण्यासाठी पाणी जास्त लागत आहे असे असतानाही बीड नगरपरिषदे ने शहरात १५ ते २० दिवसाला तर काही ठिकाणी २२ दिवसाला पिण्याचे पाणी मिळत आहेत त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे असे असतानाही ऐन उन्हाळ्यात पाइपलाइन लिकेज् दुरूस्तीचे आणि जोडाजोडीचे काम सुरू केले आहेत, पाणीपुरवठा लवकरात लवकर करून पाणी सुरळीत करावे व ज्याठिकाणी पाइपलाइन नाही किंवा पाणी येत नाहीत असे ठिकाणी टँकर ने पाणी द्यावे, बीड शहरात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहेत पावसाळ्यापूर्वीच बीड शहरातील मुख्य नाले व गटरांची साफसफाई करून घ्यावी व स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, सहा सहा ते आठ आठ महिने पासून पथदिवे बंद पडलेले आहेत गल्ली बोळात अंधेरा पसरल्यामुळे लोक रस्त्यावर पडून त्यांना दुखापत होत आहे म्हणून प्रत्येक खंब्यावरचे लाईट चालू करून घ्यावे या मागणीसाठी आज सर्व पक्षीय नगरसेवकांनी हे एकत्र येऊन

मुख्याधिकारी श्रीमती अंधारे यांच्या कॅबिन मध्ये घुसले होते, सविस्तर चर्चा झाल्यानंतर मुख्याधिकारी श्रीमती अंधारे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तंबी देत सदर सर्व प्रश्न मार्गी लागेल असे आश्वासन सर्व नगरसेवकांना दिले आहे, या शिष्टमंडळामध्ये खुर्शीद आलम, सैय्यद सादेउजमा, दत्ता जाधव, सैय्यद इलियास, जलील खान, जैतुल्ला खान, आमेर अण्णा, मुन्ना इनामदार, संजय उडान, एकबाल भाई, बाबा मेंबर, शेख अश्फाक, लक्ष्मण इटकर, गुड्डो मेंबर, मुजीब एवन, फय्याज मन्यार, शाहनवाज खान, आमेर इनामदार, अमोल अहिरे, सोनु पटेल, कौसर भाई, शहेबाज मोमीन यांच्यासह अनेक जेष्ठ नागरिक मा. नगरसेवक आणि समाजसेवक उपस्थित होते,

शाळा आणि शिक्षणाची गोडी सफा ने बालपणातच दाखवली

अंगणवाडी ताईंनी सफा सह आजीच्या केलेल्या सत्काराची सर्वत्र चर्चा

बीड ।प्रतिनिधी

आपल्याकडे एक म्हण आहे 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' ही म्हण कागज़ी दरवाज़ा येथे आजोळ असणाऱ्या बार्शी च्या सफा मोमीन या तीन वर्षीय चिमुकलीने दाखवून दिले. यामुळे तिचे तिच्या आजीसह अंगणवाडी ताईंकडून हार, पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन सत्कार करण्यात आले. याची चर्चा सर्वत्र होऊ लागली आहे.बीड शहरातील कागज़ी दरवाज़ा परिसरात राहणारे फरीदा-मुसा शेख यांची मोठी मुलगी फरहिन शेख ही बार्शी येथील महेदवी नगर येथे सासरी राहते. ती चार महिन्यांपूर्वी दुसऱ्या बाळंतपणासाठी आई-वडिलांकडे बीड येथे आली होती. इथे आल्यानंतर तिची तीन वर्षीय मुलगी सफा समीर मोमीन हिने तिच्या आजीला विचारले 'नानी यहाँ अंगणवाडी है क्या? यावर त्यांनी 'है ना, क्यूँ? असा प्रश्न केल्यावर तिने सांगितले 'मै हमारे वहाँ के जैसा यहाँ भी अंगणवाडी मे जाऊंगी' आणि तिने आजीकडे अंगणवाडीत जायची जिद्द केली म्हणून आजी फरीदा यांनी तिला दुसऱ्या दिवशी कागज़ी दरवाज़ा येथील अंगणवाडीत नेले. तेव्हा तिने आजीला सांगितले, 'अब तुम घर कू जाओ, छुट्टी होते वक्त लेने कू आओ'

आणि अशाप्रकारे सफा येथील अंगणवाडी मध्ये गेल्या चार महिन्यांपासून न चुकता, एकही खाडा न करता दररोज गेली. थोडे लिहिणे-वाचणे ही शिकली. आता तिची आई फरहिन दुसरी प्रसूती होऊन दीड महिना झाल्यामुळे बार्शी ला सासरी जाणार असल्याने आता उद्यापासून सफा अंगणवाडीत येणार नाही असे अंगणवाडी ताईंना सफाच्या आजी फरीदा यांनी सांगितल्याने चार महिन्यांपासून दररोज न चुकता अंगणवाडीत येणारी सफा आता उद्यापासून आपल्याकडे येणार नाही म्हणून अंगणवाडी ताई नफीस रहीम यांनी अंगणवाडी सेविका तसेच सर्व अंगणवाडी मधील मुलांमुलींसमोर सफा चे पुष्पहार घालून, मिठाई देऊन तर तिच्या आजी फरीदा यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कारित केले. पाहता पाहता ही वार्ता परिसरात पसरल्याने याची जोरदार चर्चा होऊ लागली आहे.

पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

जम्मू -काश्मिरच्या पहलगाम मधील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणारे बैसरण खोरे येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.यावेळी हिंदू - मुस्लिम भाई भाई म्हणत पाकिस्तान मुर्दाबाद हल्लेखोरांना फाशी द्या पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार

यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द,अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अँड . गणेश वाणी,अशोकराजे वाणी ,महादेव कुदळे,शेख शफीभाऊ, समीर शेख,कैलास काटे, बालाजी निर्मळ,शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ,कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे,आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.

वाघा बॉर्डर बंद,पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश

सायं.दैनिक
विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ● Mo-9422404740
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
बीड जिल्हा
गुरूवार, दि.२४ एप्रिल २०२५
THURSDAY, DT.24 APRIL 2025

लोकशाही पत्रकार संघाच्या रामेश्वर तांगडे, भारत वालेकर, दत्तू पवार यांच्या निवडी जाहीर

पुणे ।प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्य उद्योग विकास समितीच्या घनसावंगी तालुका सचिव रामेश्वर तांगडे, तर बीड शहर अध्यक्ष भारत वालेकर,नाशिक जिल्हा उपाध्यक्ष- कार, ट्रक ड्रायव्हर विकास समिती पदी दत्तू पवार यांच्या निवडी श्रद्धा कंडूडे प्रदेश अध्यक्ष,संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, श्री उमाकांत गव्हाणे चित्रपट दिग्दर्शक, श्री पांडुरंग साळुंखे पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार केली. या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, पाटील ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग क्षेत्रात कलासेस च्या माध्यमातून महिला आपल्या पायावर उभा करीत आहेत. गारमेंट क्षेत्रातील मोठं क्लस्टर उभा करून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.

नवनिर्वाचित पदाधिकारी रामेश्वर तांगडे म्हणाले की, जालना जिल्ह्या सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये पत्रकारांची फळी तयारी करून मोठी ताकत निर्माण करून उद्योग क्षेत्रात देखील मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू. मला खात्री आहे की, शासन सर्व तो परी सहकार्य करील.असेही निवडी प्रसंगी तांगडे बोलत होते. रामेश्वर तांगडे, भारत वालेकर, दत्तू पवार यांचा आय कार्ड, निवड पत्र देऊन सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे - उद्योग विकास समिती,मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य , संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड,शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष,नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले - सोलापूर शहर सचिव,

जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात,प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

मेस्टाचा राज्यस्तरीय बेस्ट स्कूल अवॉर्ड श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूलला प्रदान

पिंपळनेर ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलला ग्रामीण भागात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मेस्टाचा राज्यस्तरीय बेस्ट स्कूल अवॉर्ड ठाणे येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नुकताच प्रधान करण्यात आला आहे. याबद्दल परिसरातील शिक्षण प्रेमी, प्रतिष्ठित नागरिक, व पालकांच्या वतीने संस्थाध्यक्ष कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.ठाणे येथे डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात मेस्टाचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले. या अधिवेशनासाठी मेस्टाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तायडे पाटील, कोकण विभाग शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, ठाण्याचे आ. निरंजन डावखरे, आ. संजय केळकर, प्रदेशाध्यक्ष डॉ. नामदेवराव दळवी, कार्याध्यक्ष प्रा. विजय पवार, राज्य संघटक अनिल असलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडला. ग्रामीण भागासाठी दिला जाणारा बेस्ट स्कूल अवार्ड २०२५ बीड जिल्ह्यातून पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूला ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल प्रदान करण्यात आला. हा सेवा गौरव पुरस्कार संस्थेच्या वतीने संस्थाध्यक्ष प्रा. सुरेश सावंत यांनी स्विकारला. दरम्यान व्यंकटेश इंग्लिश स्कूलने गतकाही वर्षापासून पिंपळनेर परिसरात शैक्षणिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. या अधिवेशनासाठी बीड जिल्हाध्यक्ष अखिलेश ढाकणे, पांडुरंग चांडक,डॉ. मेघराज पिंगळे, मराठवाडा संघटक श्रीमंत सानप, संतोष पटाईत, डॉ. राजीव घुगे, प्रा. नजीर पठाण, सचिव ज्ञानेश्वर तांबे, प्रा. मस्के, प्रा.धायतडक

सनगावमधील वकील तरुणीस मारहाणीप्रकरणी आरोपी अजूनही मोकाट!

तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन करणार वर्षा जगदाळे

बीड ।प्रतिनिधी

आंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे घडलेल्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. गावातील वकील ज्ञानेश्वरी अंजान यांना गावातील सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकरणी युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात १० आरोपींविरोधात विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले असूनही, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.मारहाणीमुळे गंभीर जखमी झालेल्या ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर सध्या बीड येथे उपचार सुरू असून, त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला देखील जीवितास धोका निर्माण झाल्याची शक्यता आहे.या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षकांना देण्यात आले असून, तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मनसेचे महिला राज्य उपाध्यक्षा वर्षा जगदाळे ,उपजिल्हाप्रमुख सदाशिव बिडवे, शहराध्यक्ष अमरजान पठाण, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे यांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.

पाटोदा शहरातील प्रतिष्ठित व्यापारी मुसलम मकराणी यांचे चिरंजीव मोहसीन मकराणी यांचे रिसेप्शन सोहळा दि.२३ एप्रिल बुधवार रोजी संत रोहिदास मंगलकार्यालयात पार पडला यावेळी उपस्थित महाराष्ट्र केसरी पै.सईद चाऊस, जेष्ठ पत्रकार अब्दुल कादर मकराणी, पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार जावेद शेख , पत्रकार सय्यद फयाज सह आदी मान्यवर उपस्थित होते...

हज यात्रेकरूंना दिली जाणार मेंदूज्वराची लस; रविवारी शिबिर आयोजित करण्यात आले आहे

बीड हज यात्रेसाठी जाणाऱ्याभाविकांसाठी येथील जिल्हा शासकीय रुग्णालय बीड येथे हज कमिटीच्या वतीने दि.२७/०५/२०२५ रोजी रविवारी सकाळी ९ ते ५या वेळेत मेंदूज्वर लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातून यावर्षी भाविक हज यात्रेसाठी जाणार आहेत. त्यांना तेथील सर्व प्रकारची माहिती शिबिराच्या माध्यमातून देण्यात आली आहे.बीड शासकीय रुग्णालय बीड व हज कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर आयोजित करून यात्रेकरूंना मेंदूज्वर लस दिली जाणार आहे. यासाठी आरोग्य विभागाकडून तयारी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य तथा वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी ,राज्य हज कमिटीचे सदस्य सलीम बागवान यांच्या आदेशानुसार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेकरूंनी शिबिरासाठी येताना पासपोर्ट, आधार, दोन छायाचित्रे

सोबत आणावीत. लसीकरणासाठी शेख अमीर मदनी, शेख इम्रान मोइनुद्दीन ,फारूकी इरफान शेख यांना हज प्रशिक्षक म्हणून संमती देण्यात आली आहे.

ग्रामसेवकाकडून प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणाच्या नावाखाली गोरगरिबांची लूट

बीड ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गोरगरिबांना घर मिळावे यासाठी सरकारतर्फे मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. मात्र काही भ्रष्ट ग्रामसेवक या योजनेच्या नावाखाली गरिबांची फसवणूक करत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत.बीड तालुक्यातील रत्नागिरी येथील ग्रामसेवकाने प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणासाठी प्रत्येक अर्जदाराकडून पाच हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. फॉर्म भरून देतो, यादीत नाव घालतो, असे सांगून पैसे उकळले जात असल्याचे काहींनी सांगितले. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करून दोषी ग्रामसेवकावर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

सरकारने सुरू केलेल्या कल्याणकारी योजनांचा लाभ खरोखर गरजूंपर्यंत पोहोचावा, यासाठी अशा भ्रष्टाचाराला आळा घालणे अत्यंत गरजेचे असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

राज्यात उष्णतेचा प्रकोप

घराबाहेर पडताना काळजी घ्या !आनेक जिल्ह्यांत उष्णतेची लाट येणार

उन्हाच्या चटक्याने राज्य होरपळत आहे. विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिली आहे. तर उर्वरित राज्यातही उन्हाची काहिली कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाने मराठवाडा आणि कोकणात उष्ण व दमट हवामानाचा इशारा देत यलो अलर्ट जारी केला आहे. आजचे हवामान कसे असेल जाणून घेऊया.

बिहार आणि आजूबाजूच्या परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून छत्तीसगड, पूर्व विदर्भ, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू ते मनारच्या अखातापर्यंत दक्षिणोत्तर हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे. त्यामुळं राज्यात उन्हाचा चटका वाढला आहे. उकाड्यातही वाढ झाली आहे. विदर्भात पारा तर ४५ अंशाच्या पुढे गेला आहे. त्यामुळं दहा उष्ण शहरात विदर्भातील पाच शहरे आहेत.

आज विदर्भातील अकोला, अमरावती, नागपूर आणि चंद्रपूर येथे

उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तसंच, कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी मध्य महाराष्ट्रातील सोलापूर मराठवाड्यातील बीड, परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण व दमट हवामानाचा अंदाज असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, उर्वरित राज्यात उन्हाचा चटका कायम असणार आहे.

उष्ण तापमान वाढीमुळे गव्हाचा दर्जा खालावला

यंदा थंडी कमी होती त्यामुळे गव्हाची वाढ पूर्णपणे झाली नाही त्यामुळे हलक्या प्रतीच्या गावांचे आवक जास्त होत आहे. त्यामुळे गव्हाला कीड लागण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. वातावरणाचा फटका गव्हाला बसल्याने पुण्याच्या मार्केट यार्डमध्ये गव्हाची आवक कमी झाली आहे. १५ एप्रिल नंतर गव्हाची आवक होती मात्र यंदा १५ मार्च नंतर गव्हाची आवक सुरू झाली. सध्या गुजरात मध्य प्रदेश आणि राजस्थान येथूनच गहू येतोय.

परळी बाजार समितीची मुदतवाढ ठेवी मध्ये १ कोटी ५० लाख रुपयांची गुंतवणूक

बाजार समितीची आधीक सक्षमतेकडे वाटचाल-सुर्यभान मुंडे

परळी / प्रतिनिधी

कृषि उत्पन्न बाजार समिती, परळी वै.चे कामकाज शासनाच्या धोरणा नुसार चांगल्या प्रकारे चालत असून या कामाकाजची दखल महाराष्ट्र शासनाने घेवून २०२३-२०२४ च्या राज्यातील ३०५ बाजार समित्यांमधून परळी बाजार समिती जिल्हयात पहिली. लातूर विभागात तिसरी व राज्यात ३८ व्या क्रमांकावर आली परळी बाजार समिती आर्थीक उन्नतीकडे वाटचाल करीत असुन ३१ मार्च २०२५ अधेर बँक खात्यातील शिल्लकेतून बाजार समितीच्या असलेल्या मुदत ठेवी मध्ये वाढ करण्यात आलेली असुन रुपये १ कोटी ५० लाख रक्कम आज रोजी मुदत ठेवी मध्ये गुंतविण्यात आलेली आहे.



परळी बाजार समितीचे कामकाज सहकार महर्षी कै. पंडीतअण्णा मुंडे यांचे ठरवून दिलेल्या ध्येय धोरणा नुसार व आपल्या भागाचे विकास पुरुष आमदार धनंजयजी मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली चालते अनावश्यक खर्चास आळा घालुन उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केल्यामुळे बाजार समिती आर्थीक सक्षम झालेली आहे. यावर्षी सोबाचीन मोठ्या प्रमाणात शासनाने खरेदी केली यामुळे बाजार समितीचे आर्थीक नुकसान होवूनही सर्व खर्च वजा जाता शिल्लक रक्कमेतुन रुपये १ कोटी ५० लाख ऐवढ्या रक्कमेची बाजार समिती मुदत ठेवी मध्ये रक्कम गुंतवणुक केली आहे. त्यामुळे बाजार समितीच्या ठेवो मध्ये वाढ झालेली आहे. बाजार समिती आणखीन आर्थीक सक्षम व उन्नती व्हावी महाराष्ट्रात प्रथम दहा मध्ये यावी यासाठी आवश्यक ते प्रयत्न सुरु आहेत असे सभापती सुर्यभान मुंडे यांनी सांगीतले.

नराधम शिक्षकास १४ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा, एक लाख रुपये दंड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश दिपक खोचे यांनी विद्यार्थ्यांनीवर बलात्कार प्रकरणी आरोपीस १४ वर्षे सक्त मजुरी व १ लाख २ हजार रूपयाच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.सदर प्रकरणील हकीकत अशी की, अंबाजोगाई येथील खोलेश्वर विद्यालयातील शिक्षक आरोपी शाम वारकड याने त्याच शाळेतील विद्यार्थीनीवर बलात्कार केला अशा प्रकारची घटना २०१९ या वर्षामध्ये घडली होती. सदर प्रकरणात पिडीत मुलीच्या आईने फिर्याद देवुन तिच्या मुलीने किडा शिक्षक आरोपी शाम वारकड याने जालना येथे स्पर्धेसाठी खेळावयास जावुन अंबाजोगाई आल्यानंतर तिच्यावर किडा संकुल अंबाजोगाई येथे बलात्कार केला व सदर प्रकरणाची माहिती कोणास सांगितली तर तुला व तुझ्या आईवडीलांना जिवे मारून टाकुन अशा प्रकारची धमकी दिली. सदरची बाब ही पिडीत मुलीच्या शाळेतील वर्तुणुकीतून तिच्या शाळेतील शिक्षीकेस लक्षात आली. तसेच मानवलोक या सामाजिक संस्थेतर्फे शाळेमध्ये लहान विद्यार्थीनींना चागला स्पर्श वाईट स्पर्श या विषयावर चर्चासत्र आयोजीत

करण्यात आले होते. त्यावेळी शाळेतील शिक्षीकेने पिडीत मुलीच्या वर्तुणुकीत झालेला बदलामुळे तिस तिच्या आईवडीलांना घरी घेवुन येण्यास सांगितले व पिडीत मुलीच्या शाळेतील

वर्तणुकीत झालेला बदल तिच्या आईवडीलांना सांगितला. त्यावरून पिडीत मुलीच्या आईवडीलांनी तिच्याकडे चौकशी केली असता तिने आरोपीने तिच्यासोबत दि. १७-१०-२०१९ रोजी कुकर्म केल्याचे सांगितले. त्यावरून पिडीत मुलीच्या आईने दि. १८-१२-२०१९ रोजी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यास फिर्याद दिली. त्यावरून गुरनं ५४५/२०१९ कलम ३५४-अ. ३७६ (एफ) (आय) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४. ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास तत्कालीन

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com